# प्रकरण चौथे

## हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्याचे अन्य विशेष -

# प्रकरण चौथे

## हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्याचे अन्य विशेष

### प्रास्ताविक -

ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचे स्वरूप कसे असते याचा सविस्तरपणे विचार पहिल्या प्रकरणामध्ये केलेला आहे. दुसऱ्या प्रकरणात हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील सामाजिकतेचे विशेष पाहिले आहेत. तिसऱ्या प्रकरणात त्यांच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखांचा विचार केलेला आहे.

ह्या प्रकरणामध्ये त्यांच्या कथात्मक साहित्याचे अन्य जे विशेष आपणाला दिसतात त्यांचा विचार करावयाचा आहे.

समाज जाणिवेतून लिहिणाऱ्या काही लेखकांच्या साहित्यात कुठे समाज जाणीव वरचढ झालेली दिसते, तर काही ठिकाणी समाजजाणीव दडपली जाऊन कलात्मक जाणीव वरचढ झालेली दिसते. ह्या दोन्ही ठिकाणी ह्या कलाकृती फसलेल्या दिसतात.

कलात्मक दृष्टया साहित्य श्रेष्ठ होण्यासाठी लेखकाने समाजपातळीवर व कलात्मक पातळीवर आशय वस्तूकडे समांतरतेने, निरपेक्ष दृष्टीने पाहिले पाहिजे. तरच त्या कलाकृतीचे स्वरूप वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने वरचे राहील.

हमीद दलवाई यामध्ये यशस्वी झालेले आहेत. त्यांचे कथात्मक साहित्य समाज व कला या दोन्ही पातळीवर समांतरतेने तोल सांभाळून आहे. आपल्या वाङ्मयीन भूमिकेशी प्रमाणिक राहून त्यांनी कथात्मक साहित्य लिहिलेले आहे. त्यामुळे त्यांचे कथात्मक साहित्य संख्यात्मकदृष्ट्या कमी असूनही गुणात्मक दृष्ट्या श्रेष्ठ व अधिक संपन्न वाटते.

१) <u>कथानक रचनेची वैशिष्ट्ये</u>

सामान्यत: फडके-खांडेकर कालखंडातील कथा, कादंबरीमधील कथानका-संबंधी काही संकेत रूढ होते. कथानक वाचकांची जिज्ञासा, उत्कंठा वाढवणारे असले पाहिजे, त्यासाठी कथानकात संघर्ष असला पाहिजे, काहीतरी रहस्यमयता असली पाहिजे, अनपेक्षित कलाटणी असली पाहिजे असे संकेत प्रचलित होते.

तंत्राच्या आहारी गेलेल्या मराठीतील कथा, कादंबरी व कविता यांच्या रचनेमध्ये १९४५ नंतर बदल पडून येऊ लागला. कथानक रचनेच्या दृष्टीने आकर्षक, उत्कंठावर्धक असलेच पाहिजे ही कल्पना लेखक जुमानीसे झाले. त्यांनी जीवन-चित्रणावर व आशयाच्या अभिव्यक्तीवर भर दिलेला आढळतो.

हमीद दलवाईंची इंधन ही कादंबरी व त्यांच्या कथा अभ्यासल्यानंतर त्यांच्या कथानकरचनेमध्ये ह्या प्रकारचा बदल आपणाला जाणवतो.

"कफनचोर" या कथेतील दारिद्र्याने ग्रासलेला मुसलमान तरुण कबरस्ता-नातील कफन चोरून बाजारात विकतो व त्यावर आपली उपजीविका करतो. एकेरात्री कबरस्तानामध्ये तरुणीच्या अंगावरील कफन काढीत असताना त्याची भावना जागृत होते. लेखकाने हे सर्व चित्रित करीत असताना कथानकामध्ये कुठेही भडकपणा आणलेला नाही. सर्व घटना वास्तव पातळीवर चित्रित केल्या आहेत. त्यांच्या इतर कथाही अशाच प्रकारे समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत.या कथेतील तरुणाची दिङ्मूढ अवस्था चित्रित केल्यानंतर

त्याला वास्तवाची जाणीव होते व तो मनातील भावना बाजूस सारून तो कफन घेतो असा वास्तवदर्शी शेवट केला आहे. कथानकरचनेचा खास प्रयास ते करीत नाहीत. कथानकातील घटना वास्तव स्वरूपाच्या असाव्यात एवढीच दक्षता दलवाई घेतात. केवळ "कफन चोर" या कथेचेच नव्हे तर त्यांच्या सगळ्याच कथांच्या कथानक रचनेचे हे वैशिष्ट्य आहे असे दिसून येते.

१९४५ नंतर मराठी साहित्यात ज्या काही चांगल्या दर्जाच्या कादंबऱ्या निर्माण झालेल्या आहेत त्यामध्ये "इंधन"चा समावेश करावा लागेल. दलवाईंनी या कादंबरीमध्ये फडके-खांडेकरप्रणित तंत्राचा अवलंब केलेला नाही. वास्तव पातळीवर जसे समाजजीवन आहे तशा प्रकारचे समाजजीवन या कादंबरीत रेखाटलेले आहे.

कादंबरीची सुरवात निवेदकाच्या गावातील आगमनाने सुरू झालेली आहे. तेथून पुढे गावामध्ये ज्या घटना घडतात त्याचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. हिंदू-मुस्लिम संघर्ष हा या कादंबरीतील प्रमुख विषय असला तरी तो वास्तव पातळीवर ठेवण्यात हमीद दलवाई यशस्वी झालेले आहेत. भाऊ-सुमती, इसाक-लक्षुमी संबंध व गावातील परटिणीचे वागणे रेखाटत असताना कुठेही भडकपणा आणलेला नाही. समाजामध्ये स्त्री-पुरुष संबंध जसे असतात तशाच प्रकारचे संबंध या कादंबरीत आहेत.

"इंधन" या कादंबरीचा शेवटही कादंबरीच्या परंपरागत धाटाचा नाही. याविषयी प्रभाकर पाध्ये म्हणतात, "इंधनला मी चाकोरी वेगळी कादंबरी म्हणतो. याचे कारण शुध्द वाङ्मयीन आहे. सर्वसाधारणपणे कथा कादंबरी जेथे संपते तेथे ती संपत नाही."[१] ही कादंबरी निवेदक आणि जनार्दन न्हावी एस्.टी.त बसून मुंबईच्या मार्गाला लागल्यावर संपायला हवी होती पण तेथे न संपता कादंबरीचे सातवे प्रकरण सुरू होते.

ह्या प्रकरणात निवेदकाने आपले मनोगत सांगितले आहे. निवेदकाचे हे मनोगत सामाजिक व मानवी जीवनसत्याचे वास्तवाच्या पातळीवर केलेले एक आकलन आहे. निवेदकाचा तो आशावाद नाही. पूर्णाकार अनुभवाची वीण पुन्हा येथे सघन झालेली आहे.

निवेदक सातव्या प्रकरणात सुरवातीलाच म्हणतो पण ही कथा तिथेच संपलेली नाही. कारण "इंधन" मधील जो संघर्ष झालेला आहे तसाच संघर्ष १९४७ मध्ये झाला होता आणि पुन्हा जीवन पूर्ववत सुरु झाले होते. आता पुन्हा संघर्ष झालेला आहे. पूर्वीसारखा तो पुन्हा मिटेल. दरवेळी मानवी विचारामुळे हा संघर्ष पेटला जातो व नंतर तो मिटून जीवन सुरळीत सुरु होते. ऱ्हास व पुनरुत्थानाचे हे चक्र समाजाच्या पातळीवर आणि व्यक्तींच्या पातळीवर असेच चालू राहणार आहे. गावातील व्यवहार पुन्हा सुरु होईल. गावातील संघर्षाची चौकशी करणारा भडकमकर सरकारला अहवाल सादर करील सरकार खटले काढून घेईल, इसाक पुन्हा कॅपटॉपला जाईल, परटिणीचे सोताबरोबरचे संबंध पुन्हा पहिल्या-सारखे सुरु होतील, जनार्दन गेल्यामुळे वाणिणीला दु:ख होईल. वाणी गावात विक्री होत नाही म्हणून दुकान हलवेल, सुदामची सून विहिरीमध्ये आत्महत्या करील. पाण्याची अडचण निर्माण झाल्यामुळे मुसलमान बायका आणि कुळवाडी बायका एका विहिरीवर पाणी भरतील.

अशा पध्दतीने गाव पुर्वीसारखे वागू लागेल. सर्व समाज मागील विसरुन एकमेकात मिसळून जाईल.

निवेदकाला लग्न झालेली सुमती पतीबरोबर मुंबईला भेटेल आणि येथून पाठीमागे न ओलांडलेल्या लक्ष्मणरेषेची आठवण होईल. "एकदा मी गावच्या पुलावर बसलो असताना ती मात्र विलक्षण सुंदर भासली होती.

आमच्यामधील ती लक्ष्मणरेषा ओलांडली जाण्याचा तो एक क्षण होता. तो क्षण तसाच सरकून पुढे गेल्याचे मला जाणवत होते" [२] आणि आता देखील निवेदक ती लक्ष्मणरेषा न ओलांडण्याचा निर्धार व्यक्त करील आणि इथे ही कथा संपलेली असेल.

निवेदकाने या प्रकरणात भविष्यातील गावातील कथा सांगितली आहे आणि हे भविष्य वास्तवाइतकेच खरे वाटावे असे आहे.

गावरहाटीचे सातत्य या प्रकरणात लेखकाने उत्तम रीतीने प्रत्ययाला आणून दिले आहे.

म्हणून सकृत दर्शनी जरी सातवे प्रकरण अलग पडल्यासारखे वाटले तरी ते तसे अलग नाही. रूढ पध्दतीच्यापेक्षा वेगळ्या प्रकारे "इंधन" कादंबरीच्या कथानकाचा शेवट आहे. कादंबरीचा आशय अधिक सधन करण्यासाठी लेखकाने तो वेगळ्या प्रकारे केला आहे, हे जाणवते.

## २) पूर्वग्रहविरहित दृष्टिकोण

समाजपातळीवर ललित साहित्य लिहिणाऱ्या लेखकांच्या लेखनामध्ये जे काही धोके संभवतात. त्यातील एक म्हणजे कोणत्याही समस्येचे मूलभूत स्वरूप समाजपातळीवर लक्षात घेतले जात नाही. विशिष्ट विचारसरणीचा स्वीकार करून साहित्य निर्मिती केल्याने त्या साहित्यकृतीतून समाजपातळीवरील समस्येवर उपाय शोधण्याकडे लेखकाचा कल झुकलेला असतो.

लेखक जर राजकीय, सामाजिक कार्यकर्ता किंवा विचारवंत असेल तर त्याचा समाजाकडे पहाण्याचा विशिष्ट दृष्टिकोण असतो. त्यांचा समाजाकडे पहाण्याचा दृष्टिकोण प्रामाणिक असेल. परंतु विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडल्याने त्यांचा प्रामाणिकपणाही निरर्थक ठरतो.

कोणत्याही लेखकाने समाजाकडे विशिष्ट दृष्टिकोणातून पहाणे, विश्लेषण करणे आणि त्या समस्येवर उपाय शोधणे गैरच असते. समाजाकडे साहित्यिकाने पूर्वग्रहविरहित दृष्टिकोण ठेवून पाहिले पाहिजे.

हमीद दलवाई यामध्ये यशस्वी झालेले आहेत. समाजजीवनाकडे ते पूर्वग्रहविरहित दृष्टिकोणातून पहातात. समाजपातळीवरील समाजकार्यकर्ता म्हणून हमीद दलवाईंची भूमिका वेगळी आहे. त्या भूमिकेत त्यांनी विशिष्ट विचारसरणीचा स्वीकार केला होता. कथात्मक साहित्य लिहित असताना अशी कोणतीच विशिष्ट विचारसरणी त्यांनी स्वीकारलेली नाही. सामाजिक कार्यकर्ता म्हणून हमीद दलवाई वेगळे आहेत, तर साहित्यिक म्हणून हमीद दलवाई वेगळे आहेत.

कथात्मक साहित्यातील त्यांच्या "इंधन" या कादंबरीत हिंदू, मुसलमान व बौध्द या समाजाचे चित्रण आलेले आहे. या समाजातील संघर्षाचे चित्रण कर करीत असताना ते कोणत्याही गटाची बाजू घेत नाहीत. पूर्वग्रहविरहित दृष्टिकोण ठेवून जातीय संघर्षाकडे पहातात.

कथात्मक साहित्यातील सामाजिक चित्रणाप्रमाणेच ते व्यक्तिचित्रणातही कोणत्याच व्यक्तीची बाजू घेत नाहीत. कथात्मक साहित्यातील व्यक्तींच्या होतून घडणा-या कृती व्यक्तींच्या स्वभाव धर्माशी सुसंगत आहेत. आपले कोणतेही मत ते व्यक्तीवर लादत नाहीत. समाजाकडे निरपेक्ष दृष्टीने पाहिल्यामुळे त्यांच्या कथात्मक साहित्यातील समाजजीवन निखळपणे अभिव्यक्त होते.

३) <u>भाषिक सामर्थ्याचा यथायोग्य उपयोग</u>

"आपण आपल्या मनातील विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करीत असतो. भाषा ही सामाजिक जशी आहे तशी वैयक्तिकही असते.

भाषेवरून आपणाला माणसाची ओळख पटते. त्याच्या बोलण्यावरून तो कोणत्या प्रदेशातील, कोणत्या समाजाचा घटक आहे, हे समजते. त्याचे लिंग, वय व व्यवसाय समजतो.

भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. साहित्यातील भाषा विचार व भावना व्यक्त करण्याचे साधन आहे. म्हणून व्यक्तिरेखा व वातावरण यांना शोभेल अशी अनुकूल भाषा अभिप्रेत असते.

साहित्यातील भाषा ही दैनंदिन जीवनात बोलली जाणारी कौटुंबिक स्वाभाविक दुसऱ्याला सहज समजेल अशी असावी लागते. ती अकृत्रिम वाटावी इतक्या सहजपणे व नैसर्गिकपणे तिचा वापर केला पाहिजे. लेखकाला आपल्या मनातील विचार व भावना थोडक्यात पण मोठ्या आशयाद्वारा मांडता आल्या पाहिजेत.

साहित्यातील भाषा ही पात्राच्या स्वभावानुसार आणि प्रवृत्तीनुसार वेगवेगळ्या पद्धतीची असावी. कथा, कादंबरीतील भाषेतून व्यक्तीची स्वभाव, वैशिष्ट्ये, श्रद्धा, समजुती त्यांची मनोवृत्ती मांडता आली पाहिजे.

हमीद दलवाई आपल्या कथात्मक साहित्यातील भाषेच्याद्वारा प्रसंगांना, पात्रांना आणि पार्श्वभूमीला प्रतीकात्मकता आणि पृथगात्मकता प्राप्त करून देतात. ते आपल्या भाषेच्या सामर्थ्याने चार-दोन फटकाऱ्यात एखादे चित्र उभे करतात. अगदी मोजक्या शब्दांत एखादा प्रसंग प्रभावीपणे वाचकांसमोर उभा करतात.

## कोकणी मुसलमानी भाषा:

हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्यातील बरीच पात्रे कोकणातील मुसलमान समाजातील असल्याने कथात्मक साहित्यातील मुसलमान पात्रांच्या तोंडी कोकणी मुसलमानी भाषेचा वापर केला आहे.

कोकणी मुसलमानी बोलीभाषेचे सारे झटके, सा-या लकबी त्या समाजातील व्यक्तींची वैशिष्टये त्यांचे शब्दप्रयोग, त्यांची वाक्यरचनेची पध्दतही त्यांच्या कथात्मक साहित्यातुन आढळून येते. त्यामुळे कथात्मक साहित्यातुन आढळून येते. त्यामुळे कथात्मक साहित्यातील व्यक्तिचित्रण जिवंत व परिणामकारक झाले आहे.

"इंधन" या कादंबरीतील निवेदक इसाकला कुळवाड्यांना कामावरून कमी केल्यावर गावातील जातीय तणाव अधिक चिघळेल असे जेव्हा म्हणतो त्यावेळी इसाक त्याला म्हणतो, "वाढू दे ! आम्ही बघून घेव समजलां ? तू का त्यांची दलाली करतांस ? जन्मभर केलीस आनी आमचां वाटोलां केलास ती थोरां झायलां काय ? आमची शेती घालवलीस. त्या कुळ-वाड्यांना चटवलेस. पन तेच तुझ्यावर उलटले तरी त्यांचीच तरफदारी करतोस ?" [3]

या भाषेवरून आपणाला कोकणी मुसलमान कसा बोलतो याचा प्रत्यय येतो. त्यांच्या कथात्मक साहित्यातील जो मुसलमान समाज आहे तो कोक-णातील आहे. त्यामुळे त्यांच्या मुसलमानी भाषेवर तिथल्या प्रदेशातील समाजाच्या कोकणी भाषेचा परिणाम झालेला आहे.

भाषेतून मानवी स्वभाव वैशिष्टयांचा आविष्कार:

हमीद दलवाई भाषेच्या जोरावर मानवी स्वभावातील जहालपणा, मवाळपणा त्यांचे वागणे याचे दर्शन त्या व्यक्तीच्या तोंडच्या भाषेतून घडवितात.

"इंधन" या कादंबरीतील निवेदक इसाकला सखुमीबरोबर कशाला संबंध ठेवतोस असे सांगताना तो म्हणतो, "अरे, गावातल्यो पोरी आता हुशार झाल्यो हैत ! त्यो माझ्या केपटाऊनवालो म्हणून टिंगल करतात.

बोलतात मला अक्कलच नाय. मी जुन्या पॅटानचा माणूस हाय जुन्या पॅटानचे कपडे घालता, जुन्या इचारानी वागता याला काय करायचा ? आणि आपल्याला तर बाईशिवाय चैनच पडत नाय, त्याला काय करनार ?"[४]

या इसाकच्या बोलण्यातून इसाकचे वागणे, त्याचा स्वभाव आणि त्याचा प्रामाणिकपणा आपणाला समजतो.

"छप्पर" या कथेतील करीम अज्ञानामुळे व मागासलेपणामुळे संपूर्ण कुटुंब क्षयाने उध्वस्त झाले म्हणून कालोखातील हे छप्परच मोडायला निघतो. त्यावेळी त्याची आई त्याला म्हणाते, "तुझ्या वाडवडिलांनी हे छप्पर बांधलं आणि मग त्या घराची भरभराट झाली. घर भरलं, धान्यांनी, माणासांनी, हे छप्पर असं भाग्याचं आहे. ते मोडल्यावर राहिलं काय ?" [५]

तिच्या या बोलण्यातून ती परंपरेला चिकटून असलेली अज्ञानी स्त्री आहे हे समजते. "महफिल" या कथेतील खतीजा दिलावर बरोबरच्या असलेल्या अनैतिक संबंधातून गरोदर राहते. तेव्हा दिलावर त्या प्रकरणात सापडू नये म्हणून आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने तिचे मूल पाडण्यात यशस्वी होतो. पण गावामध्ये त्याचे हे संबंध समजतात. त्याचे साथीदार त्याला तुझी गावामध्ये अब्रू गेली असे जेव्हा म्हणतो तेव्हा तो म्हणातो, "ती जाऊ दे रे ! या गावात साला अब्रूदार आहेच कोण ? त्याला मी डरत नाही. लोक घेत ना आता आपलं नाव ? आपले काय जाते ?"[६]

या त्याच्या बोलण्यातून त्याच्या स्वभावातील बेफिकीरपणा व त्याचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोण आपणाला समजतो.

## बोलण्यातून मानवी भावनेचा क्षोभ:

"इंधन" या कादंबरीतील शिमग्याच्या वेळी गावातील पालखीच्या मिरवणुकीत मुसलमान समाज दंगा करतो. इतर समाजातील बायांची अब्रू

नासवतात. संघर्ष झाल्यानंतर निवेदक तेथे जातो. निवेदकाला पहाताच तावातावाने एक जण पुढे येतो आणि म्हणतो, "त्यानी धां बायकांना आडवं लोळवलं. बाप्यांदेखत त्यांची अब्रू घेतली तुमच्या बायांची आम्ही अशीच इज्जत घव. याद राखुन ठेवा." ७ या त्याच्या बोलण्यातून त्या व्यक्तीच्या भावनेचा क्षोभ लेखकाने मोठ्या ताकतीने योग्य समर्पक शब्दांत उभा केलेला आहे.

भाषेतून समाजमनाचे दर्शन:

इसाक बौध्द समाजातील लक्ष्मीला घरी ठेवतो. हे बौध्दांना जसे आवडत नाही तसे मुसलमानांना देखील आवडत नाही. इसाकच्या या वागण्या-बद्दल मुसलमान समाज म्हणतो, "अरे मास खावा नि हाडूक फेकून घावा ती ऐसा गल्यात घालून मिरवायचं कशाला !" ८

बौध्द धर्माची दीक्षा घेतलेले महार मुसलमानांच्या शेतात पहिल्या-सारखे काम करीत नाही. पुढे शेतातील कामे कोण करणार हा प्रश्न मुसलमानांना भेडसावत होता. पण आज लक्ष्मीसारख्या स्त्रिया कामावर येतात. मुसलमान समाज मनाशीच म्हणतो, "आज तो बीत गई, कलका कल देखेंगे !" ९ लेखकाने कोकणी मुस्लिम बोलीभाषेतील या वाक्यातून मुस्लिम समाजमनाचे दर्शन घडविले आहे.

आवाजाच्या चित्रणातून वातावरणनिर्मिती:

वातावरण निर्मितीसाठी भाषेचा योग्य वापर केल्यास तो प्रसंग अधिक उठावदार होतो. ध्वनिचित्रणामुळे वातावरण निर्मितीचे भाषेचे सामर्थ्य वाढते.

"इंधन" या कादंबरीतील निवेदकाला सुमती आपल्यावर निवेदकाच्या भावाने केलेला बलात्काराचा प्रसंग सांगत असताना लेखक आवाजाचे चित्रण करून वातावरण निर्मिती करतो.

"तिचे शब्द वाशिष्टीच्या पावसाळ्यातील फेसाळ प्रवाहासारखे वाटू लागले. मध्येच अंगणातल्या पातेरीच्या आवाजाचे तरंग उठत होते. मधूनच उचंबळून आलेल्या भावनांचे भोवरे निर्माण होत होते. आणि शब्दांचा प्रवाह तेवढाच खंडित होत होता. मग तिचे हुंदक्यावर हुंदके मला ऐकू येऊ लागले. शब्दांची धार ओथंबून राहिली आणि त्यांच्या प्रतिमा अस्पष्ट, धुरकट बनल्या. त्या शब्दांना स्वैपाकघरात इतस्तत: चुकचुकत फिरणाऱ्या पालींच्या आवाजासारखे भयानक अर्थ निर्माण होऊ लागले."[१०] या सर्व शब्दांतून आपणाला लेखकाने योग्य वातावरण निर्मिती केल्यामुळे सुमतीचे दु:ख आपल्या मनावर अधिक परिणाम करते.

४) निवेदन:

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातील निवेदन साधे, सोपे व सरळपणे केलेले आहे. ग्रामीण साहित्यातील निवेदनांविषयी गो.मा. पवार म्हणतात, "ग्रामीण समाजातील व्यक्तींचे वर्तन साहित्याच्या पातळीवर समजून सांगण्यासाठी, ग्रामीण जीवनातील अंतर्गत ताणावाचे दर्शन घडविण्यासाठी ग्रामीण व्यक्तींच्या वर्तनातील सुसंगती-विसंगती दाखवून जीवनार्थ प्रकट करण्यासाठी लेखकाने पात्राहून वेगळी भूमिका घेऊन निवेदन करणे अपरिहार्य असते."[११] हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यात अशाच प्रकारचे निवेदन केले आहे. त्यांनी निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे. काही ठिकाणी वर्ण्यविषय चटकन समजण्यासाठी कोकणी मुसलमानी भाषेतील शब्द वापरले आहेत. त्यामुळे त्या जातीची जीवनकहाणी चटकन आपणाला समजते.

"शोरणं" या कथेतील हसनखानचे लग्न होऊन दहा वर्षे झालेली असतात. अनेक उपाय करूनही त्याला मूल होत नाही. म्हणून दु:खी होणाऱ्या हसनखानची अवस्था लेखक निवेदनातून सांगतो, "सदानकदा दु:खी कष्टी दिसू

लागला. स्वत:च्या आणि बायकोच्या कर्माला बोल लावू लागला. चार-चौघात उठ-बस करणं तो टाळू लागला. हिरमुसला होऊन तसबी-जपमाळ घेऊन पडवीतल्या फळाटीवर गमभीन होऊन बसू लागला." १२

निवेदनाचा गंभीर सूर आणि एका लयीनतील वाक्ये हसनखानचे दु:ख गडदपणाने व्यक्त करतात. दलवाईंनी अनेक कथांतून ग्रामीण भागातील अज्ञांनी परंपरेला चिकटून असणाऱ्या व्यक्तींची मानसिक अवस्था यथार्थपणे मांडली आहे.

"खुदा हाफिज" या कथेत मुसलमानांचे पूर्वीचे वैभव मिळविण्यासाठी संघटना स्थापन करणाऱ्या सद्रुद्दीनच्या प्रकृतीतील बदलाचे लेखक निवेदन करतो, "सुद्रुद्दीनची प्रकृती पहिल्यासारखी राहिली नव्हती. त्याचे फुगीर गाल आत गेले होते. शरीर कल्पनातीत वाळले होते. केस निबरट झाले होते. पूर्वीचा त्याचा तजेला नाहीसा झाला होता आणि गोरा चेहरा काळवंडला होता."१३ लेखकाने केलेल्या या निवेदनातून सद्रुद्दीनच्या शरीरातील बदल हा केळच्या वेळी आहार नाही. मानसिक ताण, अविश्रांती यामुळे झालेला आहे. हे आपणाला कथेतील कथानकाची पार्श्वभूमी न समजताही समजून येतो.

"इंधन" मधील परटिणीचे लग्न झाले नव्हते. परंपरेने आलेला कपडे धुण्याचा व्यवसाय ती करीत असते. गावात अनेक मुसलमान खोताबरोबर संबंध असणाऱ्या परटिणीची इस्त्री करीत असताना भावना कशी जागृत होते हे सांगताना लेखक निवेदन करतो, "इस्त्रीमध्ये कोळसे टाकून ती पेटवायची. एका हाताने इस्त्रीला वारा घालायची, दुसऱ्या हाताने कपड्यांवर पाणी शिंपडून ते भिजवायची, इस्त्रीतले सारे कोळसे पेटू लागायचे, फुरफुरायचे ती विलक्षण गरम व्हायची, त्या इंधनाच्या लालसाल प्रकाशात तिचा चेहरा बदलून जायचा. वेगळाच भासायचा. बसलेली गालफडे गोबरी गुबगुबीत दिसू लागायची. संकट कांती तजेल बनायची . होकीच्या खोरी केसांचे पाणी

घमघम घमकू लागायचे. निबर शरीराच्या आकारबद्द रेषा प्रगटू लागायच्या. धगीने शरीराला घामाच्या उपळी लागायच्या, हात, पाय, चेहरा, पोट-या घामाने माखून जायच्या." १४

इस्त्रीच्या धगीने भावना जागृत झालेल्या परटिणीच्या शरीरामध्ये इस्त्री जशी गरज होत जाईल, तशा प्रकारे होत जाणा-या बदलाचे हे निवेदन वाचून लेखकाजवळ निरीक्षण दृष्टीचे किती सामर्थ्य आहे हे समजते.

"इंधन" या कादंबरीतील निवेदकाने गावामधील वास्तव्यात वाणीण, सुमती, जनार्दन न्हावी, भाऊ, सुदाम, सुदामची सून, परटीण, लक्षुमी यांचे जीवन जवळून पाहिले होते. गाव सोडून शहराकडे निघालेल्या निवेदकाच्या तोंडी लेखकाने, "मर्शिलिंग यार्डात शंटिंग होत असलेल्या मालगाडीचे डबे ठरल्या सांध्यावर अलग होऊन वेगवेगळ्या दिशेने जागी पोचतात. तशी ती जीवनाच्या रूळावरून घरंगळत पुढे चाललेली मला दिसू लागली..." १५ ही शहरी उपमा घालून या सर्वांच्या जीवनाचा आराखडा निवेदनातून अगदी अचूक शब्दांत आपल्या समोर उभा केला आहे.

कथात्मक साहित्यातील निवेदनातून व्यक्तिचित्रण जसे रेखाटलेले आहे. तशाच प्रकारे समूहचित्रे व निसर्गवर्णने सर्व तपशिलासह रंगविलेली आहेत.

"इंधन" या कादंबरीतील शिमग्याच्या वेळी निघालेल्या पालखीच्या मिरवणुकीचे लेखक निवेदन करतो.

"पालखी झुलत पुढेच आली.... मागून मिरवणुकीचा जमाव लोटला, फेटे बांधलेले हातात बोलटाच्या काठ्या घेतलेले मराठे, कुळवाडी साक्काशा चालत होते. त्यात हरबाराव देखील होता. लंगोटीच्या जागी पंचा नेसला होता. त्याच्या मागून बायका चालल्या होत्या. त्या निर्धास्तपणे पावले टाकीत होत्या. त्या मिरवणुकीतील आनंदाचा खराखुरा सोहळा त्यांच्यात प्रगटला

होता. म्हाकिणी, मराळणी, कुळवाळणी झाडून सा-या त्यात गोळा झाल्या होत्या. कधी सहसा बाहेर न पडणा-या म्हाळ्याच्या बायका खडेदार लुगडी नेसल्या होत्या. अंगावर दागिने मढवून आल्या होत्या. त्यांनी डोकीवर पदर घेतले होते. त्यांच्या नाकातल्या मोठाल्या नथी चमकत होत्या. त्यात सुदामची सूनही होती. तीही फुललेल्या वेह-याने त्या मिरवणुकीत सामील झाली होती. अगदी शेवटी अडखळत परटिण चालली होती. अगदी स्वत:ला विसरल्यासारखी पाय टाकीत होती. मागे पडल्याचे जाणवून धावत पुढे येत होती आणि इतर बायकांत सामील होत होती. पुन्हा मागे पडत होती." १६ मिरवणुकीत सामील झालेल्या स्त्री-पुरुषाचा पोषाख, त्यांच्या चालण्याची विशिष्ट ढब, हे सर्व लेखकाने निवेदनातून वर्णन करून तो प्रसंग जिवंत व बोलका केलेला आहे.

"इंधन" कादंबरी कोकणातील ग्रामीण जीवनावर लिहिलेली आहे. या कादंबरीत अनुमानानुसार कोकणातील निसर्गामध्ये होणा-या बदलाचे वर्णन लेखकाने निवेदनातून केले आहे.

निवेदक एस्.टी.च्या गाडीतून उतरल्याबरोबर त्याला दिसलेल्या गावातील निसर्गाचे वर्णन लेखक करतो, "दिव्याला लटकणा-या जळमटासारखा ढगांनी सूर्य घेरला होता. रस्ता वेडावाकडा चढत गेला होता. पुन्हा खोल उतरला होता. त्याच्या कडेला वाढलेल्या मेंदीवरले पावसाचे थेंब अद्यापि तिला पकडून राहिले होते. सारखे चमचमत होते. रस्त्याच्या दोन्ही दिशांना पसरलेल्या शेतातील भाताच्या पिवळ्या लोंगानी मान टाकली होती. दिवस बुडायच्या आधीच अंधार दाटला होता." १७

पावसाळ्यातील हा निसर्ग लहान लहान तपशिलासह रेखाटलेला आहे.

या कादंबरीतील पहिल्या सहा प्रकरणामध्ये भूतकाळ आणि वर्तमानकाळ यामध्ये रेंगाळणारे निवेदन आहे. भूतकाळातील निवेदनामुळे कथानकावरील पकड

कुठेही सैल झालेली नाही. शेवटच्या प्रकरणात लेखकाने भविष्यकालीन घटना सांगितलेल्या आहेत. निवेदनाच्या सामर्थ्यावर भविष्यकालीन घटनांचा फक्त निर्देश केला आहे.

हमीद दलवाईंनी कुठेही वैचारिक अगर तात्त्विक भूमिकेचे प्रदर्शन न करता, भाष्य न करता साध्या, सोप्या भाषेत परंतु अत्यंत प्रभावीपणे निवेदन केले आहे.

५) संवाद:

कथा कादंबरीमध्ये अनेक घटना प्रसंगाच्या निमित्ताने संवाद आलेले असतात. संवादामध्ये स्वाभाविक व अकृत्रिम वाटेल अशी सहज सुंदर भाषा असावी. संवाद नाट्यपूर्ण असावेत. पण नाटकी असू नयेत.

हमीद दलवाईंच्या शैलीमध्ये गोडवा व जिव्हाळा आहे. त्यांच्या कथात्मक साहित्यातील विविध भावतरंगानी नटलेले संवाद मानवी स्वभाव आणि एखादा प्रसंग जीवंत आपल्यासमोर उभा करतात. संवादामधून बोली-भाषेचा वापर केल्यामुळे ते संवाद अधिक परिणामकारक झालेले आहेत.

निवेदक व वडील यांच्यामधील संवाद:

"इंधन" या कादंबरीतील निवेदक ब-याच वर्षांनी आजारी अवस्थेत गावी येतो. आपला मुलगा ब-याच दिवसांनी दिसताच वडिलांच्या डोळ्यां-तून पाणी येते. त्यावेळी दोघांच्यामध्ये झालेले संभाषण पहाण्यासारखे आहे.

"कवा निघालोस ?"

"सकाली एस्.टी. नी."

"तब्येत कैशी हय आता ?"

"बरी हाय."

"दिलाची बेमारी झालेय ?"

"हो. पन काळजीचं कारन नाय. डॉक्टरनी आराम कराया सांगलान हाय."

"बरं - अफसोस तो आता बैस आराम कर."

"हो - "

ते काही क्षण पुन्हा स्तब्ध राहिले. मग म्हणाले, "जा आत जा. भाबीस आत जेवन करतेय. न्हा-धो. खाऊन आराम कर. येयाचं कागद का नाय लिव्हलास ?"

"अचानक बेत ठरलो."

"पन तार करयाची. भावस बाजारात उतरया नाय आपलो असतो..."

मी काहीच म्हणालो नाही. मलाच माझ्या येण्याचा गाजावाजा करायचा नव्हता. आता पंधरा वर्षांनी येत असल्याचे जाहीर करायची मनाला भीती वाटत होती.

"बरं जा आता."

वडील व मुलगा यांच्यामधील या घरगुती संवादातून वडिलांना मुला-विषयी वाटणारे प्रेम मोजक्या शब्दांतून लेखकाने मांडलेले आहे.

निवेदक व भाबी यांच्यामधील संवाद:

"इंधन" या कादंबरीतील निवेदकाच्या घरी ब्राह्मणाची सुमती चहा पिते. याचे बऱ्याचवर्षांनी आलेल्या निवेदकाला आश्चर्य वाटते. सुमती गेल्यानंतर निवेदक व भाबी यांच्यामधील हा संवाद - "बामन लोक पयल्यानं घरात येयाचे नाय नि आपल्याला घेयाचे नाय. पण दुनया बघ कैशी बदलली हाय."

"तुम्हीच बघा - ती गोशासुध्दा खाते."

"काय म्हनतास ?"

मला आश्चर्याचा धक्का बसला. एवढया बदलाची मी कल्पना करू शकत नव्हतो. "तुम्हाला काय म्हायेत हाये ? चार दिस -हा. म्हंजे आनिक कलेल. आनी मंग गावाचे लोक तुमच्याहून म्होरे गेल्याचां तुम्हाला वाटेल."[११]

भाबी व निवेदक यांच्या या संवादातून केवळ सुमतीच बदललेली नाही तर पंधरा वर्षापूर्वीची गावातील समाज आणि आजचा बदललेला समाज चटकन समजतो.

निवेदक व इसाक यांच्यामधील संवाद:

"इंधन" या कादंबरीतील नव-याने नेलेली लक्ष्मी पुन्हा परत येते व इसाकच्या घरी राहते. निवेदक एके दिवशी रस्त्याने जाताना वाटेत आपल्या घराच्या बांधकामावर देखरेख करीत असलेला इसाक बोलवतो. निवेदकाने इसाकच्या घरावर काम करीत असलेल्या लक्ष्मीला पाहिल्यानंतरच्या निवेदक व इसाक यांच्यामधील हा संवाद -

"रे, मोप दिसांनी आयलोस ? वर ये ना."
मी अभाविनपणे जवळ गेलो. म्हणालो, "तुजां घर बघायलां आयलो. पन लक्ष्मी कवां आयली ?"

"आयली !" इसाक विजेत्याच्या आविर्भावात हसत म्हणाला,

"हां, हां, वा ! क्या कहना ! अरे, तू तर ह्यो जस्तुम निघालोस ! लोक बोलतात, तुला कशाशी पंच्यातच नाय. आनी तू लक्ष्मीची चौकशी करायला लागलोस ? हां ? दिलचस्पी है ?"

"नाही रे बाबा. मी अगदी सहज इचारलां तुला !"

"मग ऐक. तुला म्हायेत आहे ? लक्ष्मीला नवयाने टाकली है."

"कुठे ?"

"कुठे ? हां हां ! अरे, कुठे काय विचारतोस ?

तुला ते दिसनारच कैसा।"

माझा प्रश्न मलाच मूर्खपणाचा वाटू लागला.

काहीतरी पुढे विचारले,

"ती आली कैशी।"

"पळून."

"आणि तू तिला पुन्हा काम देलास।"

"का । काय हरकत हाये । मी तिला राहायलाही जागोबी
देलो हांय."

"राहायला ?"

"होय. ती बापाकडे जात नाही. बाप म्हणतो, मला जांवयाचो दोष लावून घ्यायचो नाय."

"आणि तुला लागेल तो ?"

"मला ? हा....हा । मला लावनारो जलमाला येयाचो है."

मी मान वर करून पाहू लागलो. लक्ष्मी आता फारच उंचावर जाऊन उभी राहिली होती. तिच्या कासोटा मारलेल्या लुगड्यातून तिच्या गो-या पोट-या डोकावत होत्या.

"अरे. डाग आत हायेत सायबा। आत ....
आत ... आत ..."

पण मी पाहतच नव्हतो। [२०]

या संवादातून आपणाला ग्रामीण समाजात आपल्या पत्नीला पळून जाते म्हणून डागण्यासारखी अघोरी प्रकार असल्याचे समजते. त्याचबरोबर इसाकला लक्ष्मीला नव-याने पुढे डागली म्हणून विचारणा-या निवेदकाचा साधेपणा व समाजाचे कोणतेही दडपण न घेता लक्ष्मीला आपल्या घरी ठेवणा-या इसाकचा बेफिकिरपणा आपणाला समजतो.

दोन स्त्रियांमधील संवाद:

"मलफिल" या कथेतील खतीजा अनैतिक संबंधातून गरोदर राहते. कुटुंबावर आलेल्या या संकटांमुळे खतीजाची अशिक्षित आई दु:खी होते. एके दिवशी गावातील इसाकची सासू तिच्या घरी येते. खतीजाचे सर्व अवयव जवळून पाहिल्यानंतर त्या दोघींमधील हा संवाद -

"पोरीला झालेय तरी काय ?

"वाताची बेमारी झायली आहे"

"मंग दवा करा. अशी डोळे झांकून बसू नुकोस. नायतर गल्यात येल।"

त्या बाईचे हे अखेरचे शब्द ऐकून तिची आई एकदम ओक्साबोक्शी रडू लागली. इसाकच्या सासूच्या गळ्याला लागली आणि म्हणाली,"मला यातनं सोडव. मी तुझ्या पाया पडते.

"मग अजून चीप कैशी बैसलीस ? कुणाला बोलली का नाहीस ? दवा पाणी का केले नाहीस ?"

"कुणाला बोलवू ? कुणाला सांगू ?

"कुणाचे हे काम ?"

"मला कैसा कळणार ?"

"तुझी पोर काय बोलते ?"

"काही बोलतच नाय."

"तुला कुनाचो संशाय येतो ?"

"माझी अक्कल नाय चालंत।"

"ठीक आहे. अशी घाबरुन जाव नको.

आपुन यातनं मारग काढू."२१

या दोन स्त्रियांमधील इसाकची सासू चतुर आहे. तिला खरे तर खतीजाच्या आईकडून खरी माहिती काढून घ्यावयाची असते. त्यासाठी ती खतीजाच्या बदललेल्या प्रकृतीचा विषय काढते. आणि साधी भोळी संकटात सापडलेली खतीजाची आई सर्व सांगून टाकते.

<u>रहीमखान व हसनखान यांच्यामधील संवाद:</u>

"शेरणं" या कथेतील हसनखानचे लग्न होऊन बरा वर्ष झालेली असतात. तरी त्याला मूल झालेले नसते तो आपल्या बायकोला झाडपाल्याची औषधे खायला देतो. मांत्रिकाकडून मंत्र टाकून गंडे-दोरे गळ्यात बांधतो. इतके करूनही त्याला मूल होत नाही. म्हणून तो दुःखी होतो. त्याची ही अवस्था पाहून गावातील रहीमखानला वाईट वाटते. त्यांच्या दोघामधील हा संवाद -

"एक गोष्ट आता मला तुला सांगायची हाय"

"लेकरू हवा म्हणून तू किती लटपटी केल्यास! आता माजा ऐक."

"काय ?" हसनखाननं सावध चित्तानं विचारलं."

"गावच्या लक्सुमीबायला अवंदा शिमग्यात शेरणा घाल. शेरणा निघू दे. अवलाद झाल्याबिगर -हायची नाय." हसनखाननं कुतुहलानं विचारलं, "पन बोलू काय ?" रहीमखान उत्तरला, "हा बोल, हे लक्सुमीबायमना लेकरू होवंदे. शेरणा निघताच मी तुज्या नावावर बोकर सोडीन. अनी मूल व्हताच तुला अरपन करीन."

"बरा!" हसनखान उद्गारला. २२

वरील संवादातून रहीमखान व हसनखान दोघेही परंपरेला चिकटून असलेले व मूल होण्यासाठी देवावर विश्वास ठेवणारे श्रध्दाळू मुसलमान पहावयास मिळतात.

<u>सारांश:</u>

हमीद दलवाईंनी आपल्या वाङ्मयीन भूमिकेशी प्रामाणिक राहून कथात्मक साहित्य लिहिलेले आहे. त्यामुळे त्यांचे कथात्मक साहित्य गुणात्मक दृष्टया श्रेष्ठ व अधिक संपन्न वाटते.

हमीद दलवाईंच्या साहित्यातील कथानक रचनेची वैशिष्टये आपण पाहिली. त्यांनी कथानक रचनेसंबंधी असणाऱ्या पारंपरिक संकेताचा वापर केलेला नाही. "इंधन" या कादंबरीचा शेवट कादंबरीच्या परंपरागत घाटाचा नाही. या प्रकरणात निवेदकाने गावामधील भविष्यातील कथा सांगितली आहे. निवेदकाने सांगितलेले हे भविष्य वास्तवाइतकेच खरे वाटावे असे आहे.

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यात हिंदू, मुसलमान व बौध्द समाजजीवनाचे चित्रण केलेले आहे. समाजजीवनाचे चित्रण करीत असताना त्यांनी कोणत्याही एका गटाची बाजू घेतलेली नाही. "इंधन" या कादंबरी-तील संघर्षाकडे ते पूर्वग्रहविरहित दृष्टिकोणातून पहातात.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखा कोकणातील मुसलमान समाजातील आहेत. त्यांनी आपल्या कथात्मक साहित्यातील मुसलमान व्यक्तींच्या तोंडी कोकणी मुसलमानी बोली भाषेचा वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिचित्रण जिवंत व बोलके वाटते. त्यांनी भाषेच्या जोरावर मानवी स्वभावाचे दर्शन त्या व्यक्तींच्या तोंडच्या भाषेतून घडविले आहे. भाषेतून व्यक्तींच्या स्वभावाबरोबरच कोकणी मुसलमानी भाषेतून मुसलमान समाजमनाचे दर्शनही घडविले आहे.

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातील निवेदन साधे, सोपे व सरळपणे केलेले आहे. निवेदनातून त्यांनी व्यक्तिचित्रण जसे प्रत्ययकारी रेखाटले आहे, तसेच समूहचित्रे व निसर्ग वर्णने सर्व तपशिलासह रेखाटलेली आहेत. त्यातून त्यांची सूक्ष्म निरीक्षणदृष्टी जाणवते.

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातील संवादामध्ये बोली-भाषेचा वापर केल्यामुळे ते संवाद अधिक परिणामकारक वाटतात. संवादातून

ते विविध भावना, दृष्टिकोण, विचार समर्थपणे चित्रित करतात. तसेच त्यांतून मानवी स्वभाव व विविध प्रकारच्या व्यक्ती डोळ्यासमोर उभ्या करतात. त्यांच्या कथात्मक साहित्याची अनेकविध वैशिष्ट्ये ध्यानात घेता कथात्मक लेखन करणारे हमीद दलवाई हे उत्तम दर्जाचे साहित्यिक आहेत याचा आपल्याला प्रत्यय येतो.

••••••

## प्रकरण चौथे

### संदर्भ ग्रंथ


१) पाध्ये, प्रभाकर – "आस्वाद" मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७७, पृ. ८८.

२) दलवाई हमीद – "इंधन", मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर, १९८१, पृ.१५२.

३) तत्रैव, – तत्रैव, पृ. ९५.

४) तत्रैव, – तत्रैव, पृ. ८७.

५) दलवाई हमीद – "छप्पर", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर १९९०, पृ.७.

६) दलवाई हमीद – "मइफिल", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर १९९०, पृ. ९५.

७) दलवाई हमीद – "इंधन", मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर, १९८१, पृ. १२६.

८) तत्रैव, – तत्रैव, पृ. ८२.

९) तत्रैव, – तत्रैव, पृ. ७२.

१०) तत्रैव, – तत्रैव, पृ. ५[illegible]


BALASAHEB KHARDEKAR LIB
IVAJI UNIVERSITY, KOL

११) पवार गो.मा. - "साहित्यातील प्रादेशिकता: भाषा आणि निवेदन"
२८ डिसेंबर १९८७ रोजी साहित्य अकादमी व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने झालेल्या सेमिनारमध्ये वाचलेला निबंध.

१२) दलवाई हमीद - "शोरणं" लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०,पृ.५९.

१३) दलवाई हमीद - "खुदा हाफिज", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर १९९०,पृ.१०२.

१४) दलवाई हमीद - "इंधन" मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर, १९८१, पृ. २०.

१५) तत्रैव, - तत्रैव, पृ. १३६.

१६) तत्रैव, - तत्रैव, पृ. १२०.

१७) तत्रैव, - तत्रैव, पृ. १.

१८) तत्रैव, - तत्रैव, पृ. ५.

१९) तत्रैव, - तत्रैव, पृ. २८.

२०) तत्रैव, - तत्रैव, पृ. ७९, ८१.

२१) दलवाई, हमीद - "महफिल", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ. ९०.

२२) दलवाई हमीद, - "शोरणं", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ. ५९, ६०.

.......

SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR *